**मे. वे.को.लि. न्यु माजरी युजी ते ओसी खाण, वे. को. लि. माजरी क्षेत्र, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. वे. को.लि. न्यु माजरी युजी ते ओसी खाण (विस्तारीत खाण प्रकल्प), वे.को.लि. माजरी क्षेत्र, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे ४७९.१६ ते ७०६.२८ हेक्टर क्षेत्रात उत्पादन क्षमता १.२० दशलक्ष टन प्रती वर्ष ते ३.७५ दशलक्ष टन प्रती वर्ष उत्पादनाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **१२/१२/२०१९** |
| **वेळ** | **:** | **सकाळी ११.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **प्रकल्प स्थळ, सामुदायिक भवन, वे.को.लि., कुचना वसाहत, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.** |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. वे.को.लि. न्यु माजरी युजी ते ओसी खाण, वे. को. लि. माजरी क्षेत्र, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. वे. को.लि. न्यु माजरी युजी ते ओसी खाण (विस्तारीत खाण प्रकल्प), वे.को.लि. माजरी क्षेत्र, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे ४७९.१६ ते ७०६.२८ हेक्टर क्षेत्रात उत्पादन क्षमता १.२० दशलक्ष टन प्रती वर्ष ते ३.७५ दशलक्ष टन प्रती वर्ष उत्पादनाच्या प्रस्तावाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. २३/१०/२०१९ रोजी सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक पत्र (TOR) जारी केले (सहपत्र-१) व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. १२/१२/२०१९ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. ०९/११/२०१९ रोजीच्या मराठी दैनिक"लोकमत" व दि. १०/११/२०१९ रोजीच्या इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी या कार्यालयाकडे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१०. पंचायत समिती कार्यालय, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
११. ग्रामपंचायत कार्यालय, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, विसलोन, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१३. ग्रामपंचायत कार्यालय, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१४. ग्रामपंचायत कार्यालय, नागलोण, ता. भद्रावती, जि. गडचिरोली.
१५. गट-ग्रामपंचायत कार्यालय, चंदनखेडी (उमरी), ता. चामोर्शी, जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ५ ते १७ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्लॉट नं. ए-१, एमआयडीसी कोनसारी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाच्या ठिकाणी असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

| | | |
|---|---|---|
| १) श्री घनश्याम भूगांवकर,<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर | - | **अध्यक्ष,** |
| २) श्री मधुकर लाड,<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) श्री. अजित पाटील,<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | - | **समन्वयक** |

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक,सुचना,विचार,आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली.तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल असे सांगितले. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी उपस्थित जनसमुदायास मे. वे.को.लि. न्यु माजरी युजी ते ओसी खाण, वे. को. लि. माजरी क्षेत्र, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. वे. को.लि. न्यु माजरी युजी ते ओसी खाण (विस्तारीत खाण प्रकल्प), वे.को.लि. माजरी क्षेत्र, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे ४७९.१६ ते ७०६.२८ हेक्टर क्षेत्रात उत्पादन क्षमता १.२० दशलक्ष टन प्रती वर्ष ते ३.७५ दशलक्ष टन प्रती वर्ष उत्पादनाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री. राजेंद्र हरडे, पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला.सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पांमुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. सचिन महातळे, नागलोण, ता. भद्रावती. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि. तर्फे कोणत्या गावाच्या हनुमान मंदिराचे विद्युतीकरण करण्यात आले आहे? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पाटाळा गावाच्या हनुमान मंदिराचे विद्युतीकरण वे. को. लि. तर्फे करण्यात आले आहे. |

**२) श्री. आनंदराव ढवस, नागलोण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाण गावाला लागूनच असनू देखील या गावाच्या रस्त्यांची स्थिती खूप खराब आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, CSR अंतर्गत या गावात खूप विकासकाम करण्यात आले आहे. रस्त्याचे काम देखील भविष्यात |

| | | |
|---|---|---|
| | | CSRअंतर्गत ग्रामसभेच्या ठरावानूसार करण्यात येईल. |
| २) | नागलोण गावातील ४४ हे. जमीन वे.को.लि. तर्फे अधिग्रहीत करण्यात आली परंतु गावातील नागरीकांना वे. को. लि.तर्फे अप्रत्यक्ष रोजगार देण्यात आलेला नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वे. को.लि. तर्फे १०२ नागरीकांना रोजगार देण्यात आला आहे. त्यापैकी ९० नागरीकांना प्रत्यक्ष रोजगार देण्यात आला आहे व १२ नागरीकांना अप्रत्यक्ष रोजगार जसे की, वाहन भाडे तत्वावर देणे, ठेकेदार पद्धतीवर नौकरी इ. देण्यात आला आहे. |

३) **<u>श्री. गणपत नानाजी महातळे, कुचना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे. को. लि. ने कावडी गावातील जमीन अधिग्रहीत केली आहे परंतु १४ व्यक्तिंपैकी फक्त ०८ व्यक्तिंना रोजगार प्राप्त झाला आहे. उर्वरित व्यक्तिंना आजपावेतो रोजगार प्राप्त झालेला नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कावडी गावातील १६.७४ हे. जमीन जिल्हा जमीन अधिग्रहण अधिकारी यांनी सन १९९०-९१ मध्ये वे.को.लि. माजरी क्षेत्रासाठी अधिग्रहीत केली होती. त्याचा मोबदला उपरोक्त विभागात दि. २५/०५/१९९६ रोज व ०२/०९/१९९६ रोजी त्या वेळेच्या पुनर्वसन धोरणानूसार जमा करण्यात आला होता. उद्योगाच्या धोरणानूसार वे.को.लि. मध्ये रोजगार प्राप्त करण्याकरिता एका व्यक्तिची कमीत कमी ३ एकर जमीन अधिग्रहीत झालेली असणे आवश्यक आहे. जी व्यक्ति वरील निकष पूर्ण करत नाही त्यांना वे. को.लि. तर्फे रोजगार प्राप्त होत नाही. |

४) **<u>श्री. राजेश रेवते, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही वे. को. लि.च्या सादरीकरणासोबत सहमत नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सादरीकरणामध्ये दर्शविलेल्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. जर कोणाला काही शंका असेल तर त्यांच्या शंकेचे निराकरण करण्यात येईल. |
| २) | रस्त्याचे सुरू असलेले बांधकाम फक्त नामशेष आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, रस्त्याचे बांधकाम प्रत्यक्षात करण्यात आलेले आहे.. |

५) श्री. शंकर पारखी, कावडी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर,

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझी जीमन सन १९९५-९६ मध्ये अधिग्रहीत करण्यात आली आहे. आमच्या गावाचे पुनर्वसन आजपावेतो वे. को. लि. तर्फे करण्यात आलेले नाही. कोणत्याही प्रकारची विकासकामे वे. को.लि. तर्फे पुनर्वसनाच्या जागेवर करण्यात आलेले नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कावडी गावाचे पुनर्वसन यशस्वीरित्या करण्यात आलेले आहे व पुनर्वसन योजनेनूसार सदर ठिकाणी शाळा, बाजारासाठी जागा, रस्ते, नाल्या, पथदिवे इ. सुविधा वे. को. लि. तर्फे पूरविण्यात आलेल्या आहेत. ग्रामसभेच्या ठरावानूसार उर्वरित विकासकामे CSR धोरणानूसार भविष्यात करण्यात येतील. |

६) श्री. रवी भोगे, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ब्लास्टींगमुळे माजरी कॉलनी १ व २ येथील घरांमध्ये तडे गेलेले आहेत. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मौजा शिवजीनगर येथील ४.७२ हे. शासकीय जमीन या प्रकल्पाकरिता अधिग्रहीत करण्यात आली होती व डफाई नं. १ कॉलनी येथे वसलेली आहे.<br>वे. को. लि. च्या सर्वेक्षणानूसार येथील नागरीकांनी या शासकीय जागेवर त्यांची घरे बांधलेली आहेत. येथी बहुतेक नागरीकांकडे जागेचे मालकी हक्क देखील नाहीत त्यामुळे राज्य शासनासोबत विचार विनिमय करून डफाई नं.१ कॉलनीचे स्थलांतरण करून पुनर्वसन करण्यात येईल.<br>प्रकल्प अहवालानूसार मौजा शिवजीनगर येथील डफाई नं.१ कॉलनी स्थलांतरीत करण्यात येईल व डफाई नं.२ कॉलनी प्रकल्पाच्या हद्दीत येत नाही.<br>वे. को. लि. ने सदर माजरी क्षेत्रातील न्यु माजरी अंडरग्राऊंड ते ओपनकास्ट प्रकल्पाच्या जमीनीकरिता दि. २३/०७/२०१७ रोजी व दि. २८/०३/२०१८ रोजी रू. ४०,००,३००/- तहसिलदार, भद्रावती यांच्याकडे जमा करण्यात आलेली आहे. |
| २) | ब्लास्टींगमुळे शेतातील पिकांचे नूकसान होत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, न्यु माजरी |

| | | |
|---|---|---|
| | | युजी ते ओसी या प्रकल्पात ब्लास्टींग करीत असताना सर्व निकषांची पूर्तता करून आजूबाजूच्या शेतीचे व घरांचे नूकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते. ब्लास्टींगमुळे कसल्याही प्रकारचे नूकसान झाल्याबाबातची तक्रार आजपावेतो वे. को. लि. कडे प्राप्त झालेली नाही. खाण सुरक्षा महानिदेशालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार ब्लास्टींग करण्यात येते. |
| ३) | CSR निधी दुसऱ्या राज्यात वळविला जाऊ शकतो काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, माजरी क्षेत्राकरिता प्राप्त झालेला CSR निधी कोठेही वळविल्या गेला नाही व तो फक्त माजरी क्षेत्राकरिताच खर्च करण्यात येईल. परंतु वे.को.लि. च्या खाणी महाराष्ट्राप्रमाणे मध्य प्रदेश येथे देखील असल्याने तेथील खाणींकरिता देखील निधीची तरतूद आहे. |
| ४) | अशा प्रकारची जाहीर लोकसुनावणी दर सहा महिन्यात घेण्यात यावी. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी ही प्रकल्पाच्या विस्तारीकरणाच्या व नविन प्रकल्पाच्या उभारणी करिताच घेण्यात येते. |

### ७) **श्री. रमेश उईके, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | श्री. निलेश कोटनाके यांच्या घराचे ब्लास्टींगमुळे नूकसान झाले आहे परंतु त्यांचे नांव वे.को.लि. च्या सर्वेक्षण यादी क्रं.२६४ मध्ये समाविष्ट करण्यात आलेले नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, त्यांनी वे. को.लि. कडे घर क्रमांक व स्थळ नमूद करून अर्ज करावा. जर डफाई नं.१ मध्ये किंवा सर्वे क्रं. १२/१, १४, १७, १८, ३४, ६९, ७०, ७१ मध्ये येत असेल तर त्याबाबत तोडगा काढण्यात येईल. |

### ८) **श्री. वर्षा ठाकरे, सरपंच कुचना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीबाबत वे. को.लि. ने माला माहिती दिली नाही. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी म.प्र.नि. मंडळातर्फे आयोजित करण्यात येते, वे.को.लि. तर्फे |

| | | |
|---|---|---|
| | | नाही. या प्रकल्पात कुचना हे गांव प्रकल्पग्रस्त गांव नाही. सदर जनसुनावणीबाबत मराठी 'दैनिक लोकसत्ता' व इंग्रजी 'दैनिक द हितवाद' या वृत्तपत्रात जाहीरात प्रकाशित करण्यात आली होती. |
| २) | स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरूस्ती करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर काम ग्रामपंचायतकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर CSR निधी अंतर्गत करण्यात येईल. |

### ९) <u>श्री. प्रविण सूर, जिल्हा परिषद सदस्य, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | CSR निधी प्रकल्पग्रस्त गावांकरिता वापरण्यात येत नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, CSR निधीचा जास्तीत जास्त वापर प्रकल्पग्रस्त गावांकरिता करण्यात येतो. वे. को.लि. तर्फे आरोग्य, पाणी पुरवठा, रस्त्यांचे बांधकाम, विद्यालये इ. प्रकारच्या पायाभूत सुविधा पूरविण्यात येत आहेत. |
| २) | गावातील विहीरींच्या पाण्याची पातळी खाली जात आहे. प्रकल्पग्रस्त गावात एकही तलाव नाही. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, या क्षेत्रात पाण्याची पातळी खाली जाणे ही सामान्य बाब आहे.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पाण्याची पातळी वाढविण्यासाठी तलाव खोलीकरण, पावसाच्या पाण्याची साठवणूक इत्यादी प्रकारचे काम प्रकल्पग्रस्त गावात करण्यात येईल. |
| ३) | वे. को.लि. ने ३९२ प्रत्यक्ष रोजगार दिल्याचे सांगितल्या जाते परंतु प्रत्यक्षात फार कमी लोकांना रोजगार मिळाला आहे. स्थानिक लोकांना ८०% रोजगार देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांसाठी अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करण्यात येईल. तसेच कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत स्थानिक लोकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील. |
| ४) | वे. को.लि. च्या जुना कुनाडा खुली खाणीमध्ये ब्लास्टींगमुळे घर पडल्याने एका मुलीचा मृत्यू झाला होता परंतु आजपावेतो त्याची नूकसान भरपाई वे. को. लि. ने दिलेली नाही. | प्रकल्प प्रवर्तकानी सांगितले की, मृत मुलीच्या वडीलांनी मान्य केले आहे की ब्लास्टींगमुळे घर पडले नसून त्यांच्या मुलीच्या मृत्यूला वे. को.लि. जबाबदार नाही. त्यांनी याबाबत शपथपत्र देखील दिले आहे व पोलिसांकडे दाखल केलेली तक्रार देखील त्यांचे समाधान झाल्यावर मागे घेतली आहे. |
| ५) | खाणीतील सांडपाणी नदीत सोडल्यामुळे आरोग्याचा | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणीतील |

| | | |
|---|---|---|
| | प्रश्न निर्माण झाला आहे. वे. को. लि. ने पिण्याच्या पाण्याची सुविधा पूरवावी. | सांडपाणी प्रक्रिया करूनच नदीमध्ये सोडल्या जाते. खाणीतून निर्माण झालेले खाणपाणी प्राथमिक प्रक्रिया करून सेडीमेंटेशन टँकमध्ये जमा केले जाते व संमतीपत्रात नमूद अटी व शर्तीनूसार नदीत सोडल्या जाते. |
| ६) | रस्ता वळवण्याबाबतची माहिती देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सादरीकरणामध्ये दर्शविल्याप्रमाणे ग्रामस्थांना संतुष्ट करून रस्ता तटबंदीच्या बाजूने वळविला जाईल. |

**१०) श्री. वासुदेव पारखी, नागलोण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे. को.लि.ने कावडी गावाचे पुनर्वसन केले परंतु जागेचा मालकी हक्क दिलेला नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कोल इंडीया लि. च्या पुनरत्थान व पुनर्वसन धोरणानूसार कावडी गावाचे पुनर्वसन करण्यात आले आहे व नागरीकांना मोबदला देखील देण्यात आला आहे. पात्र नागरीकांना १०० चौ. मी. प्रमाणे जागा देण्यात आली आहे. पुनर्वसन म्हणजे शासनाच्या जागेवर वास्तव्याची परवानगी असणे, जागेचा मालकी हक्क देण्यात येत नाही. |
| २) | कावडी गावाची जवळपास २० एकर जागा जास्तीची आहे ज्याचा वापर जनहितार्थ करण्यात येऊ शकते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर २० एकर जागा भविष्यात न्यु माजरी युजी टू ओसी या प्रकल्पांतर्गत करण्यात येणाऱ्या पुनर्वसनाकरिता राखीव ठेवण्यात आली आहे. |

**११) श्री. विठ्ठल ढवस, नागलोण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या शेत सर्व्हे नं. ६१ च्या शेजारी अधिभार ढिगारे टाकण्यात आले आहेत. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कोणत्याही प्रकारचे अधिभार ढिगारे शेतीच्या शेजारी टाकण्यात आले नाही. अधिभार ढिगाऱ्याकरिता आरक्षित केलेल्या ठिकाणीच टाकण्यात आले आहे. |

१२) **श्री. प्रविण आमटे, ग्रामपंचायत सदस्य, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ब्लास्टींगमुळे घराला तडे गेलेले आहेत. तहसिलदार, भद्रावती व वे. को.लि. यांचेकडे तक्रार देखील दाखल करण्यात आली आहे. या वस्तीचे पुनर्वसन करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, न्यु माजरी युजी ते ओसी या प्रकल्पात ब्लास्टींग करीत असताना सर्व निकषांची पूर्तता करून आजूबाजूच्या शेतीचे व घरांचे नूकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते. ब्लास्टींगमुळे कसल्याही प्रकारचे नूकसान झाल्याबाबतची तक्रार आजपावेतो वे. को. लि. कडे प्राप्त झालेली नाही. खाण सुरक्षा महानिदेशालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार ब्लास्टींग करण्यात येते.<br>मौजा शिवजीनगर येथील ४.७२ हे. शासकीय जमीन या प्रकल्पाकरिता अधिग्रहीत करण्यात आली होती व डफाई नं. १ कॉलनी येथे वसलेली आहे.<br>वे. को. लि. च्या सर्वेक्षणानूसार येथील नागरीकांनी या शासकीय जागेवर त्यांची घरे बांधलेली आहेत. येथी बहुतेक नागरीकांकडे जागेचे मालकी हक्क देखील नाहीत त्यामुळे राज्य शासनासोबत विचार विनिमय करून डफाई नं.१ कॉलनीचे स्थलांतरण करून पुनर्वसन करण्यात येईल.<br>प्रकल्प अहवालानूसार मौजा शिवजीनगर येथील डफाई नं.१ कॉलनी स्थलांतरीत करण्यात येईल व डफाई नं.२ कॉलनी प्रकल्पाच्या हद्दीत येत नाही.<br>वे. को. लि. ने सदर माजरी क्षेत्रातील न्यु माजरी अंडरग्राऊंड ते ओपनकास्ट प्रकल्पाच्या जमीनीकरिता दि. २३/०७/२०१७ रोजी व दि. २८/०३/२०१८ रोजी रू. ४०,००,३००/- तहसिलदार, भद्रावती यांच्याकडे जमा करण्यात आलेली आहे. |

१३) **श्री. पुरूषोत्तम पुंड, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे शेत सव्हे नं. ३४०/२(अ) हे वे. को. लि. च्या वर्कशॉप जवळ आहे. खाणीतून होणाऱ्या धूळीच्या उत्सर्जनामुळे माझ्या शेतीच पिकांचे नूकसान होत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वर्कशॉप मधून धूळीचे उत्सर्जन होत नाही. तसेच धूळ उत्सर्जन रोखण्यासाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. |
| २) | पाटाळा गावातील किती जमीन वे. को. लि. ने अधिग्रहीत केलेली आहे व किती उर्वरित आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पाटाळा गावातील २१९.३० हे. जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली आहे व २२७.१२ हे. जमीन विस्तारकरणावेळी अधिग्रहीत करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ३) | नाल्या साचालेल्या पाण्यामुळे पिकांचे नूकसान होत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सी. डी. ओ. नाशिक यांनी प्रस्तावित केलेल्या योजनेनूसार नाला वळविण्यात आला आहे ज्यामुळे नाल्याचे पाणी साचून पिकांचे नूकसान होण्याची बाबच निर्माण होत नाही. जिल्हा प्रशासनाने सदर जागेची पाहणी केली व शिरणा नाल्याच्या खोलीकरणाचे आदेश पारित केले. त्यानूसार वे.को.लि. ने १९६०० घनमिटर जागेचे उत्खनन करून नाल्याच्या खोलीकरणाचे काम पूर्ण केले आहे व त्याची माहिती महसूल विभागाला दिली आहे. |

१४) **श्री. नामदेव डाहूले, पळसगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | नाल्याच्या पाण्यामुळे शेत पिकांचे नूकसान होत असून नाल्या दुसऱ्या दिशेने वळविण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सी. डी. ओ. नाशिक यांनी प्रस्तावित केलेल्या योजनेनूसार नाला वळविण्यात आला आहे ज्यामुळे नाल्याचे पाणी साचून पिकांचे नूकसान होण्याची बाबच निर्माण होत नाही. जिल्हा प्रशासनाने सदर जागेची पाहणी केली व शिरणा नाल्याच्या खोलीकरणाचे आदेश पारित केले. त्यानूसार वे.को.लि. ने १९६०० घनमिटर जागेचे उत्खनन करून नाल्याच्या खोलीकरणाचे काम पूर्ण केले आहे व त्याची माहिती महसूल विभागाला दिली आहे. |

१५) **श्री. माधव ताजणे, पळसगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ब्लास्टींगमुळे घरांना तडे गेले आहेत. | प्रकलप प्रवर्तकांनी सांगितले की, पळसगांव ब्लास्टींग क्षेत्रापासून फार लांब आहे व न्यु माजरी युजी ते ओसी या प्रकल्पात ब्लास्टींग करीत असताना सर्व निकषांची पूर्तता करून आजूबाजूच्या शेतीचे व घरांचे नूकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते. खाण सुरक्षा महानिदेशालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार ब्लास्टींग करण्यात येते. या करिता भारतीय तंत्रज्ञान संस्था, खडगपूरच्या तज्ञ व्यक्तिंकडून अभ्यास करण्यात आला आहे. या अहवालानूसार ब्लास्टींग दरम्यान उत्सर्जित होणाऱ्या धूलीकणांचे प्रमाण हे ५ मिलीमिटर/सेकंद पेक्षा जास्त असायला नको. परंतु या प्रकल्पात ब्लास्टींग दरम्यान उत्सर्जित होणाऱ्या धूलीकणांचे प्रमाण हे २ मिलीमिटर/सेकंद इतके असून त्या विहीत मर्यादेत आहेत. तरी वे. को. लि.तर्फे सर्वेक्षण करण्यात येईल व आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. |

१६) **श्री. विठ्ठल भूरकुंडे, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे. को.लि. ने माजरी कॉलनी येथील जमीन अधिग्रहीत केलेली आहे. काही लोकांना त्यांच्या जागेचा मोबदला मिळालेला आहे व काही व्यक्तिंना मोबदला मिळालेला नाही. ज्या व्यक्तिंना मोबदला मिळालेला नाही त्यांना लवकरात लवकर मोदला देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वे. को.लि. अधिग्रहीत केलेल्या ४३१.२७ हे जागेपैकी फक्त ७.२१ हे. जागेकरिता मालकीहक्काच्या वादामुळे मोबदला देण्यात आलेला नाही. तथापि, टीआयएलआर सर्वे प्रगतीपथावर असून ५०% सर्वेक्षण करण्यात आलेले आहे व सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे पुढील प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्यात येईल. |

१७) **श्री. सलमान शेख, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ७/१२ वर जागेच्या मालकाच्या नावा ऐवजी वे. को. लि. नांव नमूद आहे. हा प्रकार ४४ प्रकरणांपैकी ५०% लोकांसोबत घडला आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर बाब महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाशी संबंधित आहे. |

१८) **श्री. दिनेश दाजीबा चट्टे, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सर्वोदय टान्स्पोर्ट या कंपनीसोबत काम करीत आहे. वाहतूकदार ओव्हरलोड असलेले ट्रक पाठवित आहेत. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कोणत्याही प्रकारचे ओव्हरलोडींग करण्यात येत नाही. तरी सदर कंत्राटदारास याबाबत निर्देश देण्यात येतील. |

१९) **श्री. बबलु राय, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | CSR अंतर्गत सामुदायिक भवन व ग्रंथलयाचे काम फक्त राजकीय व्यक्तिंसाठी करण्यात आलेले आहे. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदर जनसुनावणीमध्ये कोणत्याही राजकीय व्यक्तीच्या नावाचा उल्लेख करण्यात येऊ नये. |

२०) **श्री. संजीव पोले, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | नागरी घनकचरा गावाच्या रस्त्याच्या कडेला टाकला जात आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वे. को. लि. ने सदर नागरी घनकचरा टाकलेला नाही. वे. को.लि. ने CSR निधी अंतर्गत स्वच्छ भारत अभियाना राबविलेला असून त्यामध्ये गावातून निर्माण होणारा घनकचरा उचलून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट करीत आहे.<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, नागरी घनकचऱ्याच्या विल्हेवाटीकरिता ग्रामपंचायतीला गरज भासल्यास म. प्र.नि. मंडळातर्फे सहकार्य |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात येईल. |
| २) | डंपींग नाल्याच्या काठावरच करण्यात येत आहे. ज्यामुळे पावसाळ्यामध्ये पूराचे पाणी आजु-बाजूच्या शेतीमध्ये शिरून पिकांचे नूकसान होत आहे. सदर नाला चुकीच्या दिशेने वळविण्यात आला आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सी. डी. ओ. नाशिक यांनी प्रस्तावित केलेल्या योजनेनूसार नाला वळविण्यात आला आहे ज्यामुळे नाल्याचे पाणी साचून पिकांचे नूकसान होण्याची बाबच निर्माण होत नाही. जिल्हा प्रशासनाने सदर जागेची पाहणी केली व शिरणा नाल्याच्या खोलीकरणाचे आदेश पारित केले. त्यानूसार वे.को.लि. ने १९६०० घनमिटर जागेचे उत्खनन करून नाल्याच्या खोलीकरणाचे काम पूर्ण केले आहे व त्याची माहिती महसूल विभागाला दिली आहे. |

**२१) <u>श्रीमती शर्मिला कवडु आमटे, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वार्ड नं. १ मध्ये पाणी साचून डेंग्यु आजाराची लागण होत आहे. सदर आजारामुळे एका बालकाचा मृत्यू देखील झालेला आहे. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदर बालकाचा मृत्यू डेंग्युमुळेच झाल्याचे सिद्ध झाले आहे काय? प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर जमा झालेले पाणी हे पावसाचे पाणी असून खाणपाणी नाही. तथापि, वे. को. लि. तर्फे सदर खड्डा लवकरात लवकर बुजविण्यात येईल. |
| २) | डंपींगचे काम मागील ३ वर्षापासून सुरूच आहे. सदर काम लवकरात लवकर आटोपण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पावसाचे पाणी साचलेल्या खड्डे बजविण्याचे काम वे. को. लि. तर्फे लवकरात लवकर करण्यात येईल. |

**२२) श्री. पिदुरकर, येकोणा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे गट नं. १४६ वे. को.लि. ने अधिग्रहीत केली असून त्याचा मोबदला आजपावेतो मला मिळाला नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शेत सर्व्हे नं. १४६ वे. को. लि. च्या मे. एकोणा-१ व २ एकत्रिकरण प्रकल्पाकरिता अधिग्रहीत केलेली आहे. जागेच्या मालकी हक्काच्या वादामुळे सदर मोबदला कोल बिअरींग एरिया (ॲक्विझिशन ॲण्ड डेवलपमंट) कायदा, १९५७ नूसार नागपूर येथील |

| | | |
|---|---|---|
| | | विशिष्ट लवादामध्ये जमा केलेला आहे. सदर मोबदला विशिष्ट लवादाकडून प्रकल्पग्रस्त व्यक्तीने घ्यावा. |

२३) **श्रीमती विद्या ढवस, सरपंच नागलोण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे. को. लि. ने गावातील शालेय विद्यार्थ्यांकरिता सुरू केलेली बस बंद केली आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, गावात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची अपूरी संख्या असल्याने सदर बस बंद करण्यात आली आहे. तथापि, विद्यार्थ्यांच्या संख्यानूसार छोटी बस लवकरात लवकर पूविण्यात येईल. |
| २) | स्थानिक सुशिक्षित बेरोजगार व्यक्तिंना रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, नागलोण गावातील ३४ व्यक्तिंना अप्रत्यक्ष रोजगार देण्यात आलेला आहे व वेळोवेळी गरजेनूसार स्थानिक सुशिक्षित बेरोजगार व्यक्तिंना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येईल. |

२४) **श्रीमती विभा ढवस, नागलोण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावातील फक्त ४ व्यक्तिंना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झालेला आहे. गावातील १००% व्यक्तिंना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, नागलोण गावातील ३४ व्यक्तिंना अप्रत्यक्ष रोजगार देण्यात आलेला आहे व वेळोवेळी गरजेनूसार स्थानिक सुशिक्षित बेरोजगार व्यक्तिंना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येईल. |

२५) **श्री. पांडुरंग आगलावे, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | उर्वरित जमीन नवीन प्रकल्पामध्ये अधिग्रहीत करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कमीत कमी जमीन अधिग्रहीत करण्याची तरतूद असते. |
| २) | प्रस्तावित खाणीतून निर्माण होणारे अधिभार ढिगारे हे नदीच्या काठावर न टाकता एका विशिष्ट ठिकाणी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रस्तावित खाणीतून निर्माण होणारे अधिभार |

| | | |
|---|---|---|
| | टाकण्यात यावे. | ढिगाऱ्याची विल्हेवाट नजिकच्या १.५ कि. मी. अंतरावर असलेल्या न्यु माजरी खूली खाणीमध्ये पुनर्भरण करण्याकरिता करण्यात येईल. |
| ३) | रानटी जनावरांचा हौदोस वाढणार. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ट्रेंच खोदताना सदर बाबत काळजी घेण्यात येईल. |

## २६) श्रीमती सुनिता पांडुरंग ढवस, नागलोण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्या जागेचे पूर परिस्थितीमुळे नूकसान झालेले आहे अशा जागेचे देखील वे. को. लि. ने अधिग्रहण करावे किंवा नूकसान भरपाई द्यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सी. डी. ओ. नाशिक यांनी प्रस्तावित केलेल्या योजनेनूसार नाला वळविण्यात आला आहे ज्यामुळे नाल्याचे पाणी साचून पिकांचे नूकसान होण्याची बाबच निर्माण होत नाही. जिल्हा प्रशासनाने सदर जागेची पाहणी केली व शिरणा नाल्याच्या खोलीकरणाचे आदेश पारित केले. त्यानूसार वे.को.लि. ने १९६०० घनमिटर जागेचे उत्खनन करून नाल्याच्या खोलीकरणाचे काम पूर्ण केले आहे व त्याची माहिती महसूल विभागाला दिली आहे. |

## २७) श्रीमती मनोरमा बंडु बंड, पळसगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणीमुळे पाण्याची पातळी खालावली आहे. पाणी पुरवठ्याचे काम करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, परिसरातील पाण्याची पातळी फक्त वे. को.लि. मुळेच खालावलेली नाही. पाण्याची पातळी वाढविण्यासाठी तलाव खोलीकरण, पावसाच्या पाण्याची साठवणूक इत्यादी प्रकारचे काम प्रकल्पग्रस्त गावात करण्यात येईल. |
| २) | पावसाळ्यादरम्यान नाल्याला पूर येऊन सदर पाणी आमच्या गावात शिरते. आमच्या गावाचे पुनर्वसन करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सी. डी. ओ. नाशिक यांनी प्रस्तावित केलेल्या योजनेनूसार नाला वळविण्यात आला आहे ज्यामुळे नाल्याचे पाणी साचून पिकांचे नूकसान होण्याची बाबच निर्माण होत नाही. जिल्हा प्रशासनाने सदर जागेची पाहणी केली |

| | | |
|---|---|---|
| | | व शिरणा नाल्याच्या खोलीकरणाचे आदेश पारित केले. त्यानूसार वे.को.लि. ने १९६०० घनमिटर जागेचे उत्खनन करून नाल्याच्या खोलीकरणाचे काम पूर्ण केले आहे व त्याची माहिती महसूल विभागाला दिली आहे. |

**२८) श्रीमती बेबी संजय गेडाम, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पिण्याचे पाणी पुरवठ्याची सुविधा पूरविण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास गरजेनूसार पाणी पूरविण्यात येईल. |
| २) | ९०% टक्के रोजगार स्थानिक लोकांना देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |
| ३) | गावातील स्वच्छतेचे काम करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्वच्छतेचे कार्य CSR अंतर्गत करण्यात येईल. |

**२९) श्री. मंगेश रामचंद्र देवगडे, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे. को.लि. ने सन १९९६ मध्ये माझ्या ४ जागा अधिग्रहीत केल्या आहेत. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर जागेचा मोबदला त्यावेळेच्या धोरणानूसार देण्यात आलेला आहे. |
| २) | ब्लास्टींगची वेळे निश्चित नाही व तेथे माहिती देण्याकरिता सुरक्षा रक्षक देखील उपलब्ध नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ब्लास्टींक दुपारी ०३:०० ते ०४:०० वा. दरम्यान करण्यात येते व वेळोवेळी तेथे सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येते. तसेच ब्लास्टींगच्या १५ मिनिट आधी सायरन वाजविण्यात येतो. |

**३०) श्रीमती मीरा पेंदोर, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमची वस्ती खाणीपासून १०० मीटर अंतरावर असून आमच्या वस्तीचे पुनर्वसन लवकरात लवकर करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मौजा शिवजीनगर येथील ४.७२ हे. शासकीय जमीन या प्रकल्पाकरिता अधिग्रहीत करण्यात आली होती व डफाई नं. १ कॉलनी येथे वसलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | वे. को. लि. च्या सर्वेक्षणानूसार येथील नागरीकांनी या शासकीय जागेवर त्यांची घरे बांधलेली आहेत. येथी बहुतेक नागरीकांकडे जागेचे मालकी हक्क देखील नाहीत त्यामुळे राज्य शासनासोबत विचार विनिमय करून डफाई नं.१ कॉलनीचे स्थलांतरण करून पुनर्वसन करण्यात येईल.<br>प्रकल्प अहवालानूसार मौजा शिवजीनगर येथील डफाई नं.१ कॉलनी स्थलांतरीत करण्यात येईल व डफाई नं.२ कॉलनी प्रकल्पाच्या हद्दीत येत नाही.<br>वे. को. लि. ने सदर माजरी क्षेत्रातील न्यु माजरी अंडरग्राऊंड ते ओपनकास्ट प्रकल्पाच्या जमीनीकरिता दि. २३/०७/२०१७ रोजी व दि. २८/०३/२०१८ रोजी रू. ४०,००,३००/- तहसिलदार, भद्रावती यांच्याकडे जमा करण्यात आलेली आहे. |

३१) **श्रीमती संगीता देविदास निखाडे, पळसगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणीतून उत्सर्जित होणाऱ्या धुळीमुळे गावातील रस्ते खराब झालेले आहे त्यामुळे गावाच्या पुनर्वसन करण्याची गरज आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणीतून धुळीचे उत्सर्जन रोखण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहे व सदर गांव खाणीपासून लांब असल्यामुळे खाणीतून उत्सर्जित होणाऱ्या धुळीचा विपरीत परिणाम होत नाही. |

३२) **श्री. नवनित खिरटकर, पळसगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | नाल्याच्या पाण्यामुळे आजु-बाजूच्या पिरसरातील शेतीचे नूकसान होत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सी. डी. ओ. नाशिक यांनी प्रस्तावित केलेल्या योजनेनूसार नाला वळविण्यात आला आहे ज्यामुळे नाल्याचे पाणी साचून पिकांचे नूकसान होण्याची बाबच निर्माण होत नाही. जिल्हा प्रशासनाने सदर जागेची पाहणी केली व शिरणा नाल्याच्या खोलीकरणाचे आदेश |

| | | |
|---|---|---|
| | | पारित केले. त्यानूसार वे.को.लि. ने १९६०० घनमिटर जागेचे उत्खनन करून नाल्याच्या खोलीकरणाचे काम पूर्ण केले आहे व त्याची माहिती महसूल विभागाला दिली आहे. |

**३३) श्री. अंकुश आगलावे, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे. को. लि. कोणत्या कायद्या अंतर्गत जमीनीचे अधिग्रहण करणार आहे? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कोल बिअरींग एरिया (ॲक्विझिशन ॲण्ड डेवलपमंट) कायदा, १९५७ अंतर्गत जमीनीचे अधिग्रहण करणार आहे. |
| २) | कोल इंडीया लिमिटेड ने पुनरूत्थान व पुनर्वसन धोरणामध्ये सन २००४ व २०१२ मध्ये सुधारणा केल्या आहेत. परंतु सन २०१२ नंतर सदर धोरणांमध्ये सुधारणा करण्यात आलेली नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कोल इंडीया लिमिटेडच्या पुनरूत्थान व पुनर्वसन धोरणामध्ये सुधारणा करण्याचे काम वे. को.लि. च्या अखत्यारीत येत नाही. |
| ३) | नविन प्रकल्पामध्ये जागेचा ताबा प्रकल्पग्रस्तांना १००% रोजगार दिल्यानंतरच घेण्यात येईल किंवा कसे? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, उद्योगाच्या प्रचलित धोरणानूसार नविन प्रकल्पामध्ये जागेचा ताबा प्रकल्पग्रस्तांना १००% रोजगार दिल्यानंतरच घेण्यात येईल. |
| ४) | पाटाळा गावाचे पुनर्वसन होणार आहे किंवा कसे? | प्रकलप प्रवर्तकांनी सांगितले की, पाटाळा गावाच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावाची तरतूद नविन प्रकल्पामध्ये करण्यात आलेली नाही. |
| ५) | पब्लिक रिलेशन डेस्कची स्थापना करण्यात यावी जेणेकरून प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना त्यांच्या समस्या वे. को. लि पुढे मांडणे सोईस्कर होईल व त्याबाबत प्रकल्पग्रस्तांना माहिती प्राप्त होईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर बाबत विचार करण्यात येईल. परंतु सद्य:स्थितीत क्षेत्रीय नियोजन अधिकारी व त्यांचे सहकारी नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपलब्ध आहे. |

**३४) श्री. कवडु चोपणे, नागलोण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावाला वे. को. लि. तर्फे पाणी पुरवठा करण्यात येतो परंतु सदर पाईपलाईन जागोजोगी फुटलेली असून त्याची दुरूस्ती करण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ग्रामपंचायतीकडून ठराव प्राप्त होताच सदर काम CSR अंतर्गत करण्यात येईल. |
| २) | स्मशानभूमीकरिता शेड व रस्ता पूरविण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ग्रामपंचायतीकडून ठराव प्राप्त होताच सदर काम CSR अंतर्गत करण्यात येईल. |

३५) **श्री. मोहन धागडी, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बंकर मधले पाणी माझ्या शेतात शिरते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ही खुल्या पद्धतीची खाण असून येथे बंकर नसल्याने बंकरमधून पाणी शिरण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. |

३६) **श्री. प्रविण अशोक पचारे, पाटाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ब्लास्टींगमुळे घरांना तडे गेले आहेत. | प्रकलप प्रवर्तकांनी सांगितले की, पळसगांव ब्लास्टींग क्षेत्रापासून फार लांब आहे व न्यु माजरी युजी ते ओसी या प्रकल्पात ब्लास्टींग करीत असताना सर्व निकषांची पूर्तता करून आजूबाजूच्या शेतीचे व घरांचे नूकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते. खाण सुरक्षा महानिदेशालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार ब्लास्टींग करण्यात येते. या करिता भारतीय तंत्रज्ञान संस्था, खडगपूरच्या तज्ञ व्यक्तिंकडून अभ्यास करण्यात आला आहे. या अहवालानूसार ब्लास्टींग दरम्यान उत्सर्जित होणाऱ्या धूलीकणांचे प्रमाण हे ५ मिलीमिटर/सेकंद पेक्षा जास्त असायला नको. परंतु या प्रकल्पात ब्लास्टींग दरम्यान उत्सर्जित होणाऱ्या धूलीकणांचे प्रमाण हे २ मिलीमिटर/सेकंद इतके असून त्या विहीत मर्यादेत आहेत. तरी वे. को. लि.तर्फे सर्वेक्षण करण्यात येईल व आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. |

३७) **श्रीमती सिंधु ताजणे, नागलोण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गावातील जास्तीत जास्त जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे त्यामुळे येथील शेतमजूरांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. | प्रकलप प्रवर्तकांनी सांगितले की, शेतमजूरांना अप्रत्यक्ष रोजगार खाणीच्या विस्तारीकरणादरम्यान प्राधान्य देण्यात येईल. |

३८) **श्री. आचार्य सुनिल गुरूजी, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माजरी कॉलनी नं. १ चे पुनर्वसन लवकरात लवकर करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मौजा शिवजीनगर येथील ४.७२ हे. शासकीय जमीन या प्रकल्पाकरिता अधिग्रहीत करण्यात आली होती व डफाई नं. १ कॉलनी येथे वसलेली आहे.<br>वे. को. लि. च्या सर्वेक्षणानूसार येथील नागरीकांनी या शासकीय जागेवर त्यांची घरे बांधलेली आहेत. येथी बहुतेक नागरीकांकडे जागेचे मालकी हक्क देखील नाहीत त्यामुळे राज्य शासनासोबत विचार विनिमय करून डफाई नं.1 कॉलनीचे स्थलांतरण करून पुनर्वसन करण्यात येईल.<br>प्रकल्प अहवालानूसार मौजा शिवजीनगर येथील डफाई नं.1 कॉलनी स्थलांतरीत करण्यात येईल व डफाई नं.2 कॉलनी प्रकल्पाच्या हद्दीत येत नाही.<br>वे. को. लि. ने सदर माजरी क्षेत्रातील न्यु माजरी अंडरग्राऊंड ते ओपनकास्ट प्रकल्पाच्या जमीनीकरिता दि. २३/०७/२०१७ रोजी व दि. २८/०३/२०१८ रोजी रू. ४०,००,३००/- तहसिलदार, भद्रावती यांच्याकडे जमा करण्यात आलेली आहे. |

३९) **श्री. कपिल रंगणकर, राळेगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बोरवेलच्या पाण्याची पातळी खालावली आहे व नाल्याच्या खोलीकरणाची गरज आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणतर्फे सर्वेक्षण करण्यात येईल व पाण्याची पातळी वाढविण्यासाठी तलाव खोलीकरण, पावसाच्या पाण्याची साठवणूक इत्यादी प्रकारचे काम प्रकल्पग्रस्त गावात करण्यात येईल. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यातआलेल्यासूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिलामाळा, उद्योगभवन, रेल्वेस्टेशनरोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(अजित पाटील)**<br>समन्वयक, पर्यावरण विषयक<br>जाहीर जनसुनावणी समिती<br>तथा उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(मधुकर लाड)**<br>सदस्य, पर्यावरण विषयक<br>जाहीर जनसुनावणी समिती<br>तथा प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(घनश्याम भुगांवकर)**<br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक<br>जाहीर जनसुनावणी समिती<br>तथा अतिरिक्त<br>जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |